स्थापना : २४ एप्रिल, १९६६

# मराठी विज्ञान परिषद

विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई – ४०० ०२२.
दूरध्वनी क्र.: (022) ४८२६३७५० / ४८२६००९४, ९९६९१००९६१ (१०:३० ते ५:३०)
इ-मेल : office@mavipamumbi.org संकेत स्थळ : www.mavipamumbai.org

**मराठी विज्ञान परिषदेची वाटचाल**

मराठीतून विज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून दि. २४ एप्रिल, १९६६ रोजी स्थापन झालेल्या मराठी विज्ञान परिषदेने २०१६मध्ये सुवर्णमहोत्सव साजरा केला. विविध विषयांवरची व्याख्याने, चर्चासत्रे इत्यादि कार्यक्रमांनी कार्याला सुरुवात झाल्यानंतर, परिषदेतील कार्यक्रमांत विद्यार्थ्यानाही सहभागी करून घेण्यात आले. ‘विज्ञान मित्र’पासून ‘संकल्पना विकसन’ अभ्यासक्रमापर्यंतचे अनेक उपक्रम परिषदेतर्फे घेतले जाऊ लागले. विज्ञान खेळणी शिबिरातून विद्यार्थ्यांना ‘हसत-खेळत शिक्षण’ देण्यासही परिषदेतर्फे सुरुवात झाली. बालविज्ञान संमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून छोटे प्रकल्प करून घेतले जाऊ लागले. याबरोबरच, विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवरील शिबिरे, तसेच भविष्यात त्यांनी संशोधनाकडे वळावे म्हणून त्यांच्यासाठी व्याख्याने घेतली जाऊ लागली. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिताही कार्यक्रम सुरू झाले. या सर्व विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमांबरोबरच शिक्षकांसाठीही व्याख्याने, प्रात्यक्षिकांसह कृतिसत्रे, संशोधन संस्थांना भेटी असे नाना प्रकारचे कार्यक्रम परिषद घेते आहे.

‘मराठी विज्ञान परिषद, पत्रिका’ या मासिकाचा विज्ञान प्रसारात मोठा वाटा आहे. वैज्ञानिक जगतात घडणाऱ्या घडामोडीची सोप्या भाषेत ओळख करून देण्याच्या उद्देशाने चालवल्या जाणाऱ्या या लोकप्रिय मासिकाने ६०० अंकांचा टप्पा केव्हाच ओलांडला आहे. सध्या दरमहा ६५०० प्रती वितरित होतात.

विज्ञान प्रसारात उल्लेखनिय योगदान, कृषितंत्रज्ञानात नाविन्यपूर्ण काम, लघुउद्योजकांनी केलेले नावीन्यपूर्ण संशोधन, विज्ञान संशोधनासाठी प्राध्यापकांकरिता एम.एम. शर्मा पुरस्कार, विद्यार्थ्यांकरिता विज्ञान संशोधन पुरस्कार, वार्षिक निबंध स्पर्धा, कथा स्पर्धा, विज्ञानविषयक पुस्तकांकरिता पारितोषिके, इत्यादी पुरस्कारांच्या मार्गाने विज्ञानप्रसार करण्याचे कामही परिषद करत आहे. लैंगिक शिक्षण, तसेच ‘वीज वाचवा, पाणी वाचवा’ यांसारख्या विषयांवरील विशेष कार्यक्रम, विघटनशील कचऱ्याचा थेट विनियोग करून ‘शहरी शेती’च्या माध्यमातून भाज्या व फळांचे उत्पादन घेण्यासंबंधीचे प्रशिक्षण अशी कितीतरी उपयुक्त कामे परिषद निरंतर करत आली आहे. परिषदेच्या वर्धापन दिन व वार्षिक अधिवेशनही उत्साहाने साजरे केले जाते. परिषदेच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे.

परिषेदेचे आजीव सभासदत्व घेतल्यास आपलाही परिषदेच्या या विज्ञान प्रसाराच्या कार्यास हातभार लागणार आहे. तेव्हा आपण परिषदेचे आजीव सभासद व्हावे, ही विनंती. त्यासाठी खाली दिलेला अर्ज भरून परिषदेकडे पाठवावा.

**प्रा. डॉ. ज्येष्ठराज जोशी**
अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद

---

कार्यवाह
**मराठी विज्ञान परिषद, मुंबई**

स.न.वि.वि.

मराठी विज्ञान परिषदेच्या सभासदत्वासाठी मी/आम्ही अर्ज करीत आहे/आहोत. त्यासाठी आवश्यक ती माहिती खाली दिली आहे.

व्यक्तीचे / संस्थेचे संपूर्ण नाव : ____________________ जन्म तारीख : ____________

व्यक्तीचा / संस्थेचा संपूर्ण पत्ता : ____________________

दूरध्वनी क्रमांक : ____________ भ्रमणध्वनी क्रमांक : ____________ इ-मेल : ____________

शिक्षण व व्यवसाय (व्यक्तीचे) : ____________________

उद्देश व कार्यक्षेत्र (संस्थेचे) : ____________________

सभासदत्वाचे वर्ग : ☐ **विद्यार्थी** ☐ **साधारण** ☐ **हितचिंतक** ☐ **आश्रयदाते** ☐ **उपकर्ते** ☐ **पत्रिका**

वर्गणी ____________________ रुपये सोबत रोख / धनादेशाने पाठवत आहे. परिषदेचे नियम व घटना मला / आम्हाला मान्य आहेत. (घटना नियम परिषदेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.)

दिनांक ____________ स्वाक्षरी ____________

संस्थेचा शिक्का संस्थेचा शिक्का संस्थेतर्फे स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे नाव व पद ____________

(फक्त संस्था सभासदांकरिता)

---

**कार्यालयाच्या नोंदीसाठी**

पावती क्रमांक ____________ सभासद क्रमांक ____________ कार्यवाहांची सही ____________

**उद्देश**

| | |
|---|---|
| १) विज्ञानाचा प्रसार प्रामुख्याने मराठी भाषेतून करणे. | २) विज्ञान व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा समृद्ध करणे. |
| ३) विज्ञानाचे जीवनात महत्त्व वाढवणे. | ४) वैज्ञानिक संशोधन व विज्ञानाची प्रगती करणे. |

**परिषदेसाठी तुम्ही काय करू शकता?**

- आपल्या जीवनात विज्ञानाधिष्ठीत विचारसरणी अंगिकारणे.
- परिषदेचे / पत्रिकेचे सभासदत्व घेणे.
- शाळा – ग्रंथालये यांच्यासाठी पत्रिकेची वार्षिक वर्गणी भरणे.
- परिषदेच्या कार्यासाठी देणगी देणे. (आयकर कलम ८०-जी अंतर्गत सवलत उपलब्ध)
- आपला काही वेळा नियमितपणे परिषदेच्या कामासाठी देणे.
- मविपच्या विज्ञान पत्रिकेतून संपादकांची संमती घेऊन विज्ञान विषयक लिखाण करणे.
- मृत्युपत्रात परिषदेच्या नावे निधीची अथवा जागेची तरतूद करणे.

**सभासदांना पुढील अधिकार राहतील.**

- परिषदेच्या साधारण सभांमध्ये भाग घेणे व मत देणे.
- परिषदेच्या निवडणुकीस, निवडणुकीच्या नियमांनुसार उभे राहणे, मतदारांच्या याद्या बघणे व मत देणे.
- परिषदेच्या संदर्भालयाचा लाभ घेणे. नियमानुसार कार्यक्रम व अधिवेशनात उपस्थित राहणे.
- विद्यार्थी सभासदांना साधारण सभेत मतदान करण्याचा, कार्यकारी मंडळावर व अन्य अधिकृत स्थानावर निवडून येण्याचा अधिकार असणार नाही.

---

उपकर्ते, आश्रयदाते, हितचिंतक या वर्गातील सभासद, आजीव सभासद मानले जातील. उपकर्ते, आश्रयदाते (व्यक्ती व संस्था) यांना छापील पत्रिका मासिक २० वर्षे पाठवले जाईल. हितचिंतक (व्यक्ती व संस्था) यांना छापील पत्रिका ५ वर्षे पाठवली जाईल. छापील पत्रिकेचा कालावधी संपल्यावर इ-पत्रिका पाठवली जाईल. साधारण व विद्यार्थी सभासदत्व एप्रिल ते मार्च अशा कालावधीसाठी असेल. आजीव / व्यक्ती सभासदत्वासाठी अठरा वर्षे पूर्ण झालेल्या कोणाही व्यक्तीस अर्ज करता येईल. विद्यार्थी सभासद वय वर्षे १८ पर्यंत होता येईल. सभासद वर्गणी एकरकमी भरावी. वर्गणी पाठवताना मराठी विज्ञान परिषद किंवा **"Marathi Vidnyan Parishad"** या नावाने धनाकर्ष (डी.डी.) असावा. मुंबई बाहेरच्या बँकेचे फक्त बहुशहरी धनादेश स्विकारले जातील. नेट बँकिंगद्वारे रक्कम भरण्यासाठी कार्यालयाशी संपर्क साधावा.

## परिषदेच्या सभासदांचे वर्ग व त्याची वर्गणी

| व्यक्ती – सभासदांचे वर्ग | संस्था सभासदांचे वर्ग |
|---|---|
| **उपकर्ते** : रू. २५,०००/- किंवा त्याहून अधिक | **उपकर्ते** : रू. ३०,०००/- किंवा त्याहून अधिक |
| **आश्रयदाते** : रू. १०,०००/- किंवा त्याहून अधिक | **आश्रयदाते** : रू. १५,०००/- किंवा त्याहून अधिक |
| **हितचिंतक** : रू. ५,०००/- किंवा त्याहून अधिक | **हितचिंतक** : रू. १०,०००/- किंवा त्याहून अधिक |
| **साधारण** : रू. १००/- **विद्यार्थी** : रू.५०/- (वार्षिक) | **साधारण** : रू. ५००/- वार्षिक |

**पत्रिका मासिक : वार्षिक वर्गणी रू. ६००/-, तीन वर्षाची वर्गणी रू. १६००/-**

**इ-पत्रिका : वार्षिक वर्गणी रू. २००/- पत्रिकेचे सभासदत्व कोणत्याही महिन्यापासून घेता येईल.**